**<u>ठळक बातम्या</u>**

- विरोधी पक्षांनी विविध कारणांवरून गदारोळ केल्यामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत स्थगित

- निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर इंडिया आघाडीचा मोर्चा

- काँग्रेस शत्रुराष्ट्रांची भाषा बोलत असल्याचा केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा आरोप

- दिल्लीत संसद सदस्यांसाठी बांधलेल्या १८४ सदनिकांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**आणि**

- मुंबईतल्या कबुतरखान्यांसदर्भात उच्च न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करायला सर्वोच्च न्यायालयाचा नकार

**<><><><><>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात विरोधी पक्षांनी विविध कारणांवरून गदारोळ केल्यामुळे आज दोन्ही सभागृहांचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत स्थगित करण्यात आलं. सकाळी अकरा वाजता राज्यसभेचं कामकाज  सुरु होताच उपाध्यक्ष हरिवंश यांनी शून्य प्रहर पुकारण्याचा प्रयत्न केला, परंतु विरोधकांनी बिहारमधल्या मतदारयाद्या पुनरिक्षणासह इतर मुद्दे मांडण्यास सुरुवात केली. विविध पक्षांकडून पाच मुद्द्यांवर २९ स्थगन प्रस्ताव प्राप्त झाल्याची माहिती उपाध्यक्षांनी दिली. यापैकी १८ प्रस्ताव न्यायप्रविष्ट असल्यानं त्यावर चर्चा होऊ शकत नसल्याचं ते म्हणाले. यावर विरोधकांनी गदारोळ करण्यास सुरुवात केली. अधिवेशनाचा कालावधी वाया जात असल्याचं सांगत उपाध्यक्षांनी विरोधकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला, पण गदारोळ कायम राहिल्यानं दुपारी दोन वाजेपर्यंत कामकाज स्थगित करण्यात आलं.

लोकसभेतही असंच चित्र दिसून आलं. विरोधक नियोजित पद्धतीनं गदारोळ करत असल्याबद्दल लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी नापसंती व्यक्त केली. करोडो रुपये वाया जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

देशभरात वन्यजीव अधिवासांचं संरक्षण, संवर्धन आणि व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीनं एकात्मिक विकास योजनेचा अवलंब केला जात असल्याची माहिती केंद्रीय वनमंत्री भूपेंद्र यादव यांनी दिली. वन्यजीव अधिवास संवर्धनासाठी तसंच मानव- वन्यजीव संघर्ष व्यवस्थापनासाठी सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना केंद्र सरकारकडून अर्थसहाय्य दिलं जातं, असं त्यांनी यासंदर्भातल्या एका प्रश्नाला दिलेल्या लिखित उत्तरात म्हटलं आहे. मानव- वन्यजीव संघर्षाची तीव्रता कमी करण्यासाठी केंद्र सरकारनं जारी केलेल्या मानक कार्यपद्धतींचं पालन होण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली आहे.

<><><><><>

निवडणूक आयोग पक्षपातीपणे काम करीत असल्याचा आरोप करुन, इंडिया आघाडीच्या खासदारांनी आज निवडणूक आयोगाच्या दिल्लीतल्या कार्यालयावर मोर्चा काढला. बिहारमधलं मतदारयाद्या पुनरिक्षण रद्द करण्याची मागणी मोर्चेकऱ्यांनी केली. पोलिसांनी मोर्चा अडवला तेव्हा आंदोलनकर्त्या खासदारांनी रस्त्यावरच ठिय्या दिला. लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्यासह अनेक खासदारांना पोलिसांनी ताब्यात घेतलं.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, अखिलेश यादव यांच्यासह अनेक खासदार मोर्चात सहभागी झाले होते.

<><><><><>

काँग्रेस शत्रुराष्ट्रांची भाषा बोलत असल्याचा आरोप केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी केला आहे. नवी दिल्ली इथं ते पत्रकारपरिषदेत बोलत होते. हातून सत्ता गेल्यामुळे अराजक माजवण्याचा काँग्रेसचा प्रयत्न असल्याचं ते म्हणाले. घुसखोरांना मतदार घोषित करुन काँग्रेसला सत्ता मिळवायची आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

काँग्रेस नेते राहुल गांधी यांना कर्नाटकच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी नोटीस बजावली आहे. २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीत, काही मतदारांनी दोनदा मतदान केल्याचा दावा राहुल गांधी यांनी केला होता. हा दावा केलेले पुरावे सादर करण्यासंदर्भात राहुल गांधी यांना, कर्नाटकचे मुख्य निवडणूक अधिकारी व्ही. अंबुकुमार यांनी काल नोटीस जारी केली आहे.

**<><><><><>**

नवी दिल्लीत संसद सदस्यांसाठी बांधलेल्या १८४ सदनिकांचं उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज झालं. बाबा खडक सिंह मार्गावरच्या या संकुलातल्या इमारतींना कृष्णा, गोदावरी, कोसी आणि हुगळी या चार नद्यांची नावं देण्यात आली आहेत. या संकुलामुळे खासदारांचं जीवनमान सुधारेल आणि लोकांसाठी अधिक कार्यक्षम राहता येईल अशी आशा प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली. २०१४ नंतर ३५० पेक्षा जास्त घरं बांधण्यात आली असून, यामुळे खर्चातही मोठी बचत होणार आहे. हे संकुल ‘एक भारत श्रेष्ठ भारत’ च्या संकल्पनेचं प्रतीक असल्याचं सांगून, प्रत्येक प्रांताच्या सणांचं आयोजन इथं व्हावं अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. ते म्हणाले -

**बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी**

यावेळी प्रधानमंत्र्यांनी शेंदूर वृक्षाचं रोप लावलं, तसंच या संकुलांचं बांधकाम करणाऱ्या कामगारांशी संवाद साधला. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू, मनोहरलाल खट्टर आदी मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><>**

मुंबईतल्या कबुतरखान्यात कबुतरांना खायला घालू नये या मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करायला नकार देत कबुतरांना खायला घालणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने बृहन्मुंबई महानगरपालिकेला आज दिले. याचिकाकर्त्यांनी आदेशात बदल करण्याची विनंती उच्च न्यायालयात करावी असंही न्यायमूर्ती जे के माहेश्वरी आणि विजय बिष्णोई यांच्या पीठाने म्हटलं आहे.

कबुतरखाना पाडू नये मात्र कबुतरांना खायला घालू नये असं उच्च न्यायालयाने महानगरपालिकेला सांगितलं होतं. त्यानंतरही काही लोकांकडून कबुतराला खायला घालणं सुरूच असल्यानं अशा लोकांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत असे निर्देश न्यायालयानं ३० जुलै रोजी दिले.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या असंघटित कंत्राटी कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा चौकट निश्चित करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारच्या विचाराधीन आहे. सुमारे पाच लाख कंत्राटी कामगारांसाठी एक कल्याण निधी स्थापन केला जाणार असून कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी या निधीमधून आरोग्य विमा, जीवन विमा, निश्चित उत्पन्न, शैक्षणिक लाभ इत्यादी सहाय्य करता येऊ शकेल. त्यासाठी कंपन्यांवर उपकर लावण्याची शिफारस कामगार विभागानं तयार केलेल्या मसुद्यात करण्यात आली आहे.

<><><><><>

जम्मू काश्मीरच्या कुलगाम जिल्ह्यात सुरक्षा दलांचं दहशवाद्यांविरोधातलं अभियान सलग अकराव्या दिवशी सुरू आहे. सुरक्षा दलांनी दहशतवाद्यांच्या तळाला चोहोबाजूंनी घेरलं असून या परिसरातलं हे आतापर्यंतचं सर्वात दीर्घ अभियान असल्याचं सांगितलं जात आहे. या अभियानात आतापर्यंत दोन दहशतवादी ठार झाले असून दोन जवानांना वीरमरण आलं आहे.

<><><><><>

अमेरिका आणि रशिया यांच्यात होणाऱ्या संभाव्य युद्धविराम करार चर्चेमध्ये युक्रेन आणि युरोपीय महासंघाचाही सहभाग असला पाहिजे, असं महासंघाचे परराष्ट्रविभाग प्रमुख काजा कल्लास यांनी म्हटलं आहे. यूरोपीय महासंघातल्या परराष्ट्र मंत्र्यांची ऑनलाईन बैठक आज झाली असून त्यात पुढच्या उपाययोजनांवर चर्चा झाल्याचंही त्यांनी सांगितलं. युक्रेनमधल्या युद्धविरामाबाबत चर्चा करण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतीन येत्या १५ तारखेला अलास्कामध्ये भेटणार आहेत.

<><><><><>

१९ वर्षांखालील आशियाई मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या निशा हिनं ५४ किलो वजनी गटात आणि मुस्कानने ५७ किलो वजनी गटात सुवर्ण पदक, तर इतर पाच जणांनी रौप्य पदक जिंकलं. नवी दिल्लीत झालेल्या या स्पर्धेत भारतानं १४ सुवर्ण पदकांची कमाई केली.

<><><><><>

भारतीय खुल्या जागतिक ॲथलेटिक्स ब्रॉन्झ लेवल कॉन्टिनेन्टल टूर स्पर्धेत भारताच्या अनू राणीने भालाफेकमध्ये विजेतेपद पटकावलं. ओडिशात भुवनेश्वर इथं सुरु

असलेल्या या स्पर्धेत अनूने ६२ पूर्णांक एक शतांश मीटरवर भाला फेकून ही कामगिरी केली. पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेत शिवम लोहकरने रौप्य पदक जिंकलं. पुरुषांच्या लांब उडी मध्ये मुरली श्रीशंकरने सुवर्ण पदक पटकावलं.

**<><><><><>**

उत्तराखंडमध्ये उत्तरकाशी जिल्ह्याच्या हर्शिल आणि धाराली भागांत अलिकडेच झालेल्या दुर्घटनेनंतर, अजुनही मोठ्या प्रमाणावर मदत, बचाव आणि शोधकार्य सुरू आहे. आतापर्यंत ११०० पेक्षा जास्त लोकांना सुरक्षित बाहेर काढलं आहे.

**//<><><><><>//**